# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

दिनांक १७.०४.२०२६ शुक्रवार

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे बेलतरोडी :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी श्यामल पवन मेश्राम वय ३२ वर्षे, रा. घर नं. १८१, टिकेकर रोड, छोटी धंतोली, पटवर्धन ग्राऊंड, धंतोली, नागपूर यांचे वडील पवन मेश्राम यांचे नावे मौजा बेसा प.ह.न. ३८, खसरा क्र. ४१, मेश्राम ले—आऊट मधील प्लॉट नं. ०४ हा आहे. फिर्यादीचे वडील डयुटीच्या निमित्ताने नेहमी बाहेर राहत असल्याने प्लॉटचे कागदपत्र यातील आरोपी मदन नारायण मेश्राम, रा. १०१, चिंतामणी अपार्टमेन्ट, प्रशांत नगर, अजनी, नागपूर (फिर्यादीचे मोठे वडील) यांचेकडे विश्वासाने ठेवले होते. दिनांक २०.०४.१९८९ ते दिनांक ०७.०६.२०२४ चे दरम्यान, आरोपी यांनी विश्वासाचा गैरफायदा घेवून कागदपत्रांमध्ये खोडतोड करून, खरे कागदपत्र लपवून, कागदपत्रांचे बनावटीकरण करून ते कागदपत्र तलाठी कार्यालय व ग्रामपंचायत बेसा येथे सादर केले व फिर्यादीच्या वडीलांच्या नावाने प्लॉट क्र. ०४ हा असतांना त्यावर खोडतोड करून प्लॉट क्र. ०३ असल्याचे शासकीय कार्यालयात दाखविले. आरोपीने फिर्यादीच्या वडीलांचे नावे असलेला प्लॉट क्र. ०४ तसेच प्लॉट क्र. ०५ व त्याचेबाजूचा प्लॉट असे मिळून त्यावर तीन मजल्यांचे अपार्टमेन्ट बांधकाम करून फ्लॅट विक्री केले. आरोपीने फिर्यादीच्या वडीलांचा अन्यायाने विश्वासघात करून फसवणुक केली.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. शिरीष सलगर ९६७३९९१४०७ यांनी आरोपींविरूध्द कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ४४७ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे ईमामवाडा :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत, सिरसपेठ, तेलंगीपूरा, प्रिया बारचे पाठीमागे, नागपूर येथे राहणारे ऑटो चालक फिर्यादी राजेश विनोद टिकले वय ३९ वर्षे, यांची आई शकुंतलाबाई यांना दिनांक १३.०४.२०२६ रोजी ऑटोने धडक दिल्याने त्यांना उपचारासाठी मेडीकल हॉस्पीटल येथे ॲडमिट केले होते. फिर्यादी व त्यांचा परिवार दवाखान्याचे गडबडीत होते व घरी कोणी राहत नव्हते. दिनांक १३.०४.२०२६ चे १६.०० वा. ते दिनांक १७.०४.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे वरील माळ्यावरील रूममधील आलमारीमधून भिसीचे भेटलेले रोख ४,५०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ५,६७,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे सपोनि. अनिल कांबळे ९०९६२५४३५८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**पोलीस ठाणे कळमना :—** दिनांक १७.०४.२०२६ चे ०७.१० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, मीनीमाता नगर, गल्ली नं. १६, राम मंदीर जवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन—अंगात निळ्या रंगाचे रेघाटी चेक्सचा हाफ शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे कळमना येथे संपर्क साधावा.

यापुकरणी फिर्यादी सरतर्फे पोहवा. ईश्वर बांबल यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. ज्ञानेश्वर मोरे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

## (मिसिंग)

**पोलीस ठाणे अजनी :—** सौ. काजल स्वप्नील मेश्राम, वय ३० वर्षे, रा. प्लॉट नं. ८३, बॅनर्जी ले—आऊट नागपूर ह्या दिनांक ०७.०४.२०२६ चे ०९.३० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट, केस— काळे लांब, अंगात— रंगीबेरंगी रंगाची कुर्ती व लाल रंगाची लॅगीन घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



काजल

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपूर शहर.**